# डेक्कन कॉलेज : पुण्याचा मानबिंदू

'विद्येचे माहेरघर' हा पुणे शहराचा नावलौकिक सार्थ ठरवण्यात दोन शतकांची वाटचाल पूर्ण करणार्या डेक्कन कॉलेजचे योगदान विशेष दखल घ्यावे असे आहे. सन 1818 ची खडकी-येरवडा लढाई संपली. ब्रिटिशांचा पुण्यावर अंमल सुरू झाला. पेशवेकाळात वेदशास्त्रांच्या अभ्यासासाठी पाठशाळांना शिष्यवृत्ती म्हणून वार्षिक दक्षिणा दिली जात असे. ब्रिटिश गव्हर्नर माउंटस्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी ही प्रथा वेगळ्या स्वरूपात चालू ठेवली. दक्षिणेसाठीचा पैसा वापरून 6 ऑक्टोबर 1821, विजयादशमी या भारतीय सणाच्या दिवशी पुण्याच्या विश्रामबागवाड्यात 'हिंदू कॉलेज' त्यांच्या प्रयत्नातून सुरू झाले. स्थानिकांना संतुष्ट ठेवण्याचाही विचार त्यामागे होता. प्राचीन शास्त्रांबरोबर हिंदू लॉ व गणित या विषयांचाही समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला. पहिल्या वर्षी 143 विद्यार्थ्यांना आकर्षित करून कॉलेजने भक्कम मुहूर्तमेढ रोवली खरी, पण त्याचे महत्त्व सरकारला पटवण्यासाठी एलफिन्स्टन यांना मोठा संघर्षही करावा लागला. पुढे इंग्रजी शिक्षणाचा समावेश करून 1851 मध्ये या कॉलेजला नवीन रूप देण्यात आले. 'पूना संस्कृत कॉलेज' म्हणून ते ओळखले जाऊ लागले. पहिले प्रिन्सिपल सर थॉमस कॅन्डी, त्याच्यानंतर सर डब्ल्यू. ए. अर्नोल्ड, विल्यम वर्ड्स्वर्थ (प्रसिद्ध कवीचे नातू) अशा थोर व्यक्तींनी या पदाची धुरा समर्थपणे सांभाळत दक्षिण इलाख्यात कॉलेजला नावलौकिक मिळवून दिला. विश्रामबागवाड्याची जागा अपुरी पडू लागली. शहराबाहेर रम्य परिसरात 1868 मध्ये कॉलेजचे स्थलांतर झाले. जमशेदजी जिजिभाई यांनी त्यावेळी दिलेल्या एक लक्ष रूपयांच्या देणगीतून गॉथिक रचनेचा उत्कृष्ट नमुना ठरलेल्या दिमाखदार वास्तुत कॉलेज भरू लागले. 'डेक्कन कॉलेज' असे नावही प्राप्त झाले. शतकाच्या अखेरपर्यंत पंधराशे इंग्रजी व सुमारे पाचशे ग्रंथांची आवक झाली. भारताच्या सर्व प्रांतांतून हस्तलिखितांचा मोठा संग्रहही कॉलेजकडे जमा झाला. मराठी, लॅटिन, गणित, लॉजिक, इतिहास इत्यादी विषय अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. विद्यार्थ्यांसाठी अनेक शिष्यवृत्त्या, जिमखाना व वसतिगृहाच्या सोयी निर्माण झाल्या. त्यामुळे सर्वच इलाख्यातून मोठा विद्यार्थी वर्ग डेक्कन कॉलेजकडे येऊ लागला. सर आर. जी. भांडारकर, किलहोर्न या नामवंतांची प्राध्यापक म्हणून कारकीर्द येथे पार पडली, तर लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, गुरुदेव रानडे, इतिहासकार राजवाडे, डॉ. द्वारकानाथ कोटणीस अशा अनेकांनी अध्ययनाचे धडे डेक्कन कॉलेजमध्ये घेतले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी पुणे परिसरात अनेक शिक्षण संस्था उदयाला आल्या. एकोणीसाव्या शतकात अग्रणी ठरलेले डेक्कन कॉलेज विद्यार्थी संख्या रोडावल्याने बंद करण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला. माजी विद्यार्थ्यांनी या निर्णयाविरुद्ध मोठा लढा दिला. उच्च न्यायालयानेही त्यांच्याच बाजूने निर्णय देत शासनाला हे कॉलेज पुन्हा सुरू करून कायमस्वरूपी त्याची जबाबदारी उचलण्याचा महत्त्वाचा निर्णय दिला. परिणामी, 17 ऑगस्ट 1939 या दिवशी डेक्कन कॉलेजची पुनःस्थापना झाली. 'पदव्युत्तर व संशोधन संस्था' या नव्या रूपात डेक्कन कॉलेज पुन्हा सुरू झाले. ही घटना केवळ कॉलेजसाठी महत्त्वाची नव्हती, तर देशातील शिक्षण व संशोधन क्षेत्राच्या भाग्योदयाशी ती निगडित होती. भारतात पुरातत्त्व व भाषाशास्त्र या दोन महत्त्वपूर्ण विद्याशाखांच्या प्रारंभ आणि विकासाचा भाग्यलेख या घटनेत लिहिलेला होता.

डेक्कन कॉलेजचे पहिले संचालक व विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुमित्र मंगेश कत्रे त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचा सर्वांगीण विकास होऊ लागला. त्यांनी सुरू केलेल्या भाषाविज्ञानाच्या उन्हाळी व हिवाळी अभ्यासवर्गांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी भारताच्या विविध भागात या विद्याशाखेचा प्रसार

केला. भारतातली पहिली ध्वनीशास्त्र प्रयोगशाळा डेक्कन कॉलेजमध्ये सुरू झाली. रॉकफेलर फौंडेशनच्या अनुदानातून मोठे संशोधन प्रकल्पही संस्थेत सुरू झाले. प्राचीन भाषांच्या तौलनिक अभ्यासासाठी प्रमाण शब्दकोशांची गरज होती. ग्रीक व  लॅटिन भाषांसाठी ते उपलब्ध होते. संस्कृतसाठी मात्र नव्हते. ही उणीव भरून काढण्यासाठी डॉ. कत्रे यांनी संस्थेमध्ये ऐतिहासिक तत्त्वांवर आधारित संस्कृत शब्दकोश प्रकल्प सुरू केला. भाषेचे कोश संपादन करण्यात पश्चिमेत ऑक्सफर्डचे जे स्थान  आहे तेच पूर्वेत पुण्याचे  आहे ते डेक्कन कॉलेजच्या संस्कृत शब्दकोश  प्रकल्पामुळेच. ऋग्वेदापासून अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत निर्माण झालेल्या सुमारे दोन हजार ग्रंथांचे प्रत्यक्ष वाचन या संस्थेमध्ये झाले (1949 ते 1973). त्यातून तेवीस लक्ष शब्दांच्या एक कोटी संदर्भांनी युक्त असे स्क्रिप्टोरियम सुसज्ज झाले. पुरातत्त्वीय अवशेषांच्या अभ्यासाबरोबरच वाङ्मयीन पुराव्यांच्या अभ्यासासाठी एक प्रमाणभूत साधन याद्वारे उपलब्ध झाले. या कोशाचे 34 खंड आजवर प्रकाशित झाले आहेत. कॉलेजचा हा शब्दकोश प्रकल्प जगातील सर्वात मोठा प्रकल्प ठरला आहे. डॉ. कत्रे यांनी भाषाविज्ञानासाठी जे अग्रगण्य कार्य केले तेच  डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया यांनी पुरातत्वशास्त्रासाठी केले. यांच्या पुढाकाराने देशातील पहिला पुरातत्त्वशास्त्राचा विभाग कॉलेजमध्ये सुरू झाला. या विभागाने प्रागैतिहासिक. इतिहासपूर्व व ऐतिहासिक काळाशी संबंधित ठिकाणी व्यापक उत्खनने हाती घेतली. नेवासा, इनामगाव, नायकुंड, भीमबेटका, बालाथल, लोथल, जुन्नर, फर्माना, राखीगडी अशी विशेष उल्लेखनीय स्थळे आहेत. या विभागातील संशोधकांनी उत्खनन न केलेला प्रदेश भारताच्या नकाशावर अपवादानेच आढळेल. इनामगाव येथील उत्खननाने आद्य शेतकरी समूहाची जीवनशैली उजेडात आणली, पण त्याचबरोबर अवशेषांच्या अभ्यासाची शास्त्रीय पद्धत व संशोधन मानके सुद्धा जगासमोर ठेवली. प्राचीन अवशेषांचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी नऊ सुसज्ज प्रयोगशाळा, विविध कालखंडातील संस्कृतींचे दर्शन घडवणाऱ्या नऊ दालनांनी परिपूर्ण असे पुरावस्तुसंग्रहालय ही या विभागाची संपदा आहे. प्राचीन इतिहास, मानव्यशास्त्र, मूर्ती व स्थापत्यशास्त्र, चित्रकला, नाणकशास्त्र, पुराभिलेख, प्राचीन साहित्य अशा अनेक विद्याशाखा येथे अभ्यासल्या जातात. खऱ्या अर्थाने बहुविद्याशाखीय अभ्यास येथे चालतो आणि त्यातून प्राचीन कालखंडाचे चित्र साकारण्याचा प्रयत्न केला जातो. डॉ. इरावती कर्वे, डॉ. सी. आर. शंकरन, डॉ. शां. भा. देव, डॉ. अ. मा. घाटगे, डॉ. अशोक केळकर, डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. वी. ना. मिश्रा, डॉ. शोभना गोखले, डॉ. गो. बं. देगलूरकर, अशा मान्यवर संशोधकांनी अध्ययन-अध्यापन आणि ग्रंथलेखन करून संस्थेला जागतिक दर्जा प्राप्त करून दिला. आजवर संस्थेतील सहा संशोधकांचा भारत सरकारने पद्म पुरस्काराने, तर सात संस्कृतज्ञांचा राष्ट्रीय संस्कृत पंडित पुरस्काराने गौरव केला आहे.  संस्थेच्या अद्‌वितीय कार्याची नोंद घेऊन 1994 साली युजीसीने संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला. तेव्हापासून संस्थेत पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र व संस्कृत कोशशास्त्र या तीन विभागात स्वतंत्र पदव्युत्तर अभ्यासक्रम व त्यांच्या जोडीला संशोधन पद्‌धती, सागरीय पुरातत्त्व, सांस्कृतिक वारसा जतन- संवर्धन, बौद्‌ध परंपरा, पर्शियन, इटालियन, जपानी, व संस्कृत भाषांचे प्रमाणपत्र असे अनेकविध अभ्यासक्रमही यशस्वीपणे चालू आहेत. 'डेक्कन कॉलेज बुलेटिन' ही शोधपत्रिका 1939 पासून नियमित प्रकाशित होत असून युजीसीप्रमाणित सूचीमध्ये तिचा समावेशही आहे. पुरातत्त्व, भाषाविज्ञान व संस्कृत या विषयांना वाहिलेली मोठी ग्रंथसंपदा संस्थेने प्रकाशित केली आहे.  ऑक्सफर्ड व कैंब्रिज विद्यापीठांसह 35 राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांसमवेत डेक्कन कॉलेजचे छोटे-मोठे शैक्षणिक करार आहेत. फिरते वस्तुसंग्रहालय,  भाषाशास्त्र विभागातील 'ओपन डे,'

इतिहास शिक्षकांची कार्यशाळा अशा माध्यमातून समाजापर्यंत आपले संशोधन पोहोचवण्याचा प्रयत्न संशोधक व विद्यार्थी सातत्याने करीत असतात. संस्थेतील मराठा इतिहास संग्रहालयात प्राचीन दस्तावेज व पुरावस्तुंचा संग्रह असून संशोधकांना त्याचा लाभ होत आहे. सुमारे दोन लाख ग्रंथ, 414 शोधपत्रकांची आवक, लोकमान्य टिळकांसह 12 अभ्यासकांचा पुस्तकसंच हा येथील ग्रंथालयाचा मौल्यवान ठेवा आहे. संस्थेचे सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, वस्तुसंग्रहालय, व संस्कृत स्क्रिप्टोरियम ही पायाभूत संशोधनाची संसाधने अभ्यासकांना वरदान ठरली आहेत. संस्थेच्या परिसरातूनच 'इण्डियन सोसायटी फॉर प्रिहिस्ट्री ॲण्ड क्वाटरनरी स्टडीज', 'सोसायटी ऑफ साउथ एशियन आर्केलॉजी', 'लिंग्विस्टिक सोसायटी ऑफ इण्डिया' या आंतरराष्ट्रीय संस्थांचे कार्य चालते. 'अमेरिकन इंस्टिट्युट ऑफ इण्डियन स्टडीज' व 'फ्रेंच इन्स्टिट्युट' या संस्थांच्या शाखा डेक्कन कॉलेज परिसरात आहेत.

'मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण व प्रतिमांकन' हा भाषाशास्त्रीय प्रकल्प प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व जिल्ह्यात जाऊन तेथील प्रत्यक्ष बोलींचे सर्वेक्षण संशोधकांनी केले आहे. गोरेवाडा, जुन्नर, बोरी येथील उत्खनन व अवशेषांचे संरक्षण- संवर्धन हे पुरातत्त्वीय प्रकल्प सध्या चालू आहेत. प्राचीन इतिहास, संस्कृती, पुरातत्त्व, आणि भाषाविज्ञान या क्षेत्रातील मूलभूत संशोधनात भारताचा गौरव वाढवणारे डेक्कन कॉलेज पुण्याचा मानबिंदू आहे. संस्थेने यावर्षी 200 व्या वर्षात पदार्पण केले आहे.कोलकत्ता व मुंबई येथील 'एशियाटीक सोसायटींच्या पाठोपाठ द्विशताब्दी पूर्ण करणारी ही भारतातील तिसरी शैक्षणिक संस्था आहे. द्विशताब्दीच्या निमित्ताने संस्थेने वर उल्लेखलेल्या विषयांवर लघुग्रंथ मालिकेचे संपादन हाती घेतले आहे. 'प्राचीन भारतीय भाषानिज्ञान' या विषयावर संस्थेने चालू केलेल्या कार्यशाळेला जगभरातून चांगला प्रतिसाद लाभला आहे, 'संस्कृत कोश परंपरा', 'दक्षिण आशियाई भाषा', 'प्राचीन हडप्पा सभ्यता', 'मंदिर स्थापत्य' या विषयांवरही आगामी वर्षात कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

डॉ. प्रसाद जोशी
प्रभारी कुलगुरू
डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था
(अभिमत विद्यापीठ)